# आम्ही असे घडलो...

संपादन : नीलिमा करमरकर

डॉ. वसंत गोवारीकर

रोहिणी भाटे

विकास आमटे

बाबासाहेब पुरंदरे

डॉ. स्वर्णलता भिशीकर

डॉ. हिम्मतराव बावस्कर

नारायण सुर्वे

सुभाष देशपांडे

आरती अंकलीकर

डॉ. विजय भटकर

शरद कापूसकर

मीरा बोरवणकर

डॉ. भीमराव गस्ती

दिलीप भाटकर

वासुदेव कामत

निळु फुले

अच्युत गोडबोले

राम नाईक

राजदीप सरदेसाई

रेणू गावस्कर

काव्य, गायन, नृत्य, चित्र, शिल्प इ. कला,
पत्रकारिता, राजकारण, विज्ञान, इतिहास,
समाजसेवा, संशोधन अशा विविध क्षेत्रातील
आदर्श म्हणाव्यात अशा २० नामवंतांनी
स्वत:च्या जडणघडणीविषयी लिहिलेल्या
लेखांचा हा संग्रह
विद्यार्थीदशेपासून होत गेलेली
व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, त्यातून सापडलेली
स्वत:च्या कार्यक्षेत्राची दिशा
व प्रत्यक्ष केलेले काम यावर त्यांनी या लेखात
प्रकाश टाकला आहे. कुणी प्रतिकूल वातावरणावर
मात करून संधी शोधून त्या दिशेने वाटचाल केली;
तर कुणी अनुकूल वातावरणामुळे सहज
समोर आलेल्या संधीचे सोने केले. अर्थात
ध्येयाचा ध्यास आणि त्याच्या प्राप्तीसाठी
कठोर परिश्रम हे सर्वांसाठी सारखेच होते.
आजच्या आणि उद्याच्या उमलत्या कुमारवयीन
मुलांनाच नव्हे, तर युवा वाचकांना, आपल्याला
भावी आयुष्यात काय करायचे आहे
हे ठरवण्यासाठी प्रेरणादायी
असे हे पुस्तक नक्कीच दिशादर्शक ठरेल !

**जडणघडणविषयक**
छात्र प्रबोधन प्रकाशन, पुणे
**किंमत ₹ १६०**
jpprakashane.org या संकेतस्थळावर उपलब्ध

# आम्ही असे घडलो...

(विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान २० व्यक्तींची जडणघडण)

**संपादन**

नीलिमा करमरकर

छात्र प्रबोधन

**ज्ञान प्रबोधिनी**

५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३०

**आम्ही असे घडलो...**
(विविध क्षेत्रातील २० कर्तृत्ववान व्यक्तींची जडणघडण)


- **प्रकाशक, मुद्रक**
  संपादक, छात्र प्रबोधन
  ज्ञान प्रबोधिनी,
  ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
  ☎ - ०२०-२४२०७१७४/१७९
  email - chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
  website - www.chhatraprabodhan.org
- **मुखपृष्ठ व सजावट**
  गिरीश सहस्रबुद्धे
- **आतील चित्रे**
  सचिन जोशी
- **संगणक अक्षर जुळणी**
  छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे
- **पहिली आवृत्ती**
  राष्ट्रीय सौर चैत्र शके १९३०, एप्रिल २००९
- **पुनर्मुद्रण ३**
  राष्ट्रीय सौर पौष शके १९४४, जानेवारी २०२३
- **वितरण**
  छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे 30
  ऑनलाइन खरेदीसाठी **jpprakashane.org / amazon.in**
- **किंमत**
  ₹ १६०/-


'Aamhi Ase Ghadalo'
(Profiles of distinguished 20 personalities in various fields)

छात्र प्रबोधन मासिकात १९९३ ते २००८ या कालावधीत प्रसिद्ध झालेले निवडक लेख या पुस्तकात पुनर्मुद्रित केले आहेत.)

# प्रस्तावना...

कला, संशोधन, वाङ्मय, समाजसेवा, राजकारण, वैद्यकीय क्षेत्र, संशोधन, प्रसिद्धीमाध्यम इत्यादी क्षेत्रांत उत्तुंग शिखरावर असलेल्या व्यक्तींचे जीवन पाहताना आपल्या मनात उत्सुकता असते. कसं बरं मिळालं असेल त्यांना हे यश? ही व्यक्तिमत्त्वाची समृद्धी कशी जोपासली असेल?

आपल्या भविष्याचं धूसर चित्र प्रत्येकाच्या मनात असतं. 'काही'तरी बनण्याची इच्छा असते; पण दिशा गवसत नसते. विविध क्षेत्रांतील नामवंत व्यक्तींनी 'छात्र प्रबोधन' मधून स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाच्या जडण-घडणीविषयी लेख लिहिले आहेत. त्यांचे संकलन केले तर भविष्यात काम करण्यासाठी किती वेगवेगळी क्षितिजे उघडी असतात, हे मुलांसमोर एकत्रितपणे येईल; समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील आदर्श त्यांच्यासमोर उभे राहतील; त्यामुळे नकळत होणाऱ्या संस्कारांनी हे संकलन प्रेरणादायी ठरेल असे वाटले.

वैद्यकीय, अभियांत्रिकी, संगणक इ. चाकोरीतील शिक्षण व विकासाच्या संधी आपल्याला खुणावत असतात; पण आयुष्याची वाटचाल केवळ भौतिक सुखांनी, पैशाने समृद्ध होत नाही. आपल्याला आवडणारे, भावणारे काम उत्तम रीतीने करण्यात खूप मोठा आनंद असतो; हे ज्यांना कळते त्यांची जीवने यशकीर्ती, समाधान यांनी उजळून निघतात. पण त्यांना मिळालेले यश आणि मोठेपणा हा विनासायास मिळालेला नसतो. त्यापाठीमागे कठोर साधना असते; आई-वडील, गुरू, संस्कार, भोवतालचा समाज, पुस्तकं यांचे संस्कार असतात; परिस्थितीने दिलेले भान असते.

या पुस्तकातील विविध लेख वाचत असताना आपल्या असे लक्षात येते की, काही जणांनी अतिशय प्रतिकूल अशा आर्थिक, सामाजिक परिस्थितीवर मात करून आपल्या संधी आपणच शोधल्या; डॉ. हिम्मतराव बावस्कर, डॉ. भीमराव गस्ती, नारायण सुर्वे यांसारख्या व्यक्तींचे अनुभव वाचताना मन अंतर्मुख होते; पण या व्यक्तींनी आपल्या आवडीनुसार, मनोधर्मानुसार त्यांच्या संवेदनशील मनाला भावतील, अशी वेगवेगळी कार्यक्षेत्रं निवडलेली दिसतात.

ज्ञान प्रबोधिनीसारख्या समाजाभिमुख संस्थेत काम करत मोठे होणारे श्री. सुभाष देशपांडे आणि डॉ. स्वर्णलता भिशीकर यांना स्वत:च्या घरातून व प्रबोधिनीचे संस्थापक डॉ. वि. वि. पेंडसे यांच्या सहवासात मोलाचे संस्कार मिळाले. त्याचा उपयोग स्वत:च्या व्यक्तिमत्त्व विकसनापुरता मर्यादित न ठेवता, आपण समाजाचे काही देणे लागतो या भावनेने आजही ते कार्यरत असलेले दिसतात.

डॉ. विकास आमटे, श्रीमती रेणू गावस्कर, डॉ. भीमराव गस्ती हे समाजातील वंचित घटकांसाठी काम करत संघर्षातून विधायक कार्याकडे वाटचाल करताना दिसतात. प्रशासन, राजकारण व प्रसारमाध्यमे या क्षेत्रात काम करताना सामाजिक बांधिलकी जपता येते, याचे भान श्रीमती मीरा बोरवणकर, श्री. राम नाईक, श्री. राजदीप सरदेसाई यांच्या लेखातून मिळते.

नृत्य, गायन, चित्र, शिल्प इत्यादी कला व साहित्य आणि इतिहास यांच्या साधनेने स्वत: कलानंद मिळवत असताना, समाजमनही समृद्ध होत असते, हे कलाक्षेत्रातील दिग्गजांचे अनुभव वाचताना जाणवते. मात्र, त्यांच्या वलयांकित यशामागे कठोर साधना असते, हे कुमारवयीन वाचकांनी लक्षात घ्यायला हवे.

उच्च शिक्षणामुळे प्राप्त होणारा मान-मरातब, कीर्ती यांचा विचार न करता संशोधन व मूलभूत कार्य यांवर आपले लक्ष केंद्रित करून ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात मोलाची भर घालणाऱ्या व्यक्तींचे अनुभव वाचताना मन अभिमानाने भरून येते.

विशेष म्हणजे या पुस्तकातील जडणघडणीचे अनुभव त्या त्या व्यक्तींनीच लिहिले आहेत. केवळ पाच व्यक्तींच्या अनुभवांचे शब्दांकन श्रीधर लोणी, चित्रलेखा पुरंदरे, आश्विनी मयेकर, शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर यांनी केले आहे.

आजच्या आणि उद्याच्या उमलत्या कुमारवयीन मुलांनाच नव्हे, तर युवा वाचकांना, आपल्याला भावी आयुष्यात काय करायचे आहे, हे ठरवण्यासाठी हे प्रेरणादायी पुस्तक नक्कीच दिशादर्शक ठरेल.

**– नीलिमा करमरकर**

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| १. विज्ञान यात्री मी आनंदयात्री... | डॉ. वसंत गोवारीकर | ६ |
| २. नृत्यातून जीवनसाधना | रोहिणी भाटे | १२ |
| ३. जेव्हा वेदनेशी नाते जुळते | विकास आमटे | १७ |
| ४. शिवचरित्र जगताना... | बाबासाहेब पुरंदरे | २४ |
| ५. मला अजून घडायचं आहे | डॉ. स्वर्णलता भिशीकर | ३१ |
| ६. कलावंत होता होता... | निळू फुले | ३६ |
| ७. स्वत:ला रचित गेलो... | नारायण सुर्वे | ४० |
| ८. आभाळ मुठीत आलंसं वाटतं तेव्हा! | सुभाष देशपांडे | ४८ |
| ९. स्वर साधना | आरती अंकलीकर | ५४ |
| १०. ज्ञानाची तीर्थयात्रा | डॉ. विजय भटकर | ६१ |
| ११. नित्य नवनिर्मितीची ओढ | शरद कापूसकर | ६८ |
| १२. 'युगंधरा'... नव्या युगाची | मीरा बोरवणकर | ७४ |
| १३. संघर्षातून विधायक कार्याकडे | डॉ. भीमराव गस्ती | ८० |
| १४. प्रवास आजवरचा | दिलीप भाटकर | ८७ |
| १५. 'इदं न मम।' | श्री. वासुदेव कामत | ९५ |
| १६. मी घडलो व घडत आहे... | डॉ. हिम्मतराव बावस्कर | १०१ |
| १७. नित्य नवा दिस उत्साहाचा | अच्युत गोडबोले | १०८ |
| १८. आटपाडी ते दिल्ली | राम नाईक | ११६ |
| १९. 'वलयांकित' पत्रकारिता | राजदीप सरदेसाई | १२४ |
| २०. समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी | रेणू गावस्कर | १२९ |